# प्रकरण पाचवे

## अभ्यास गट

## प्रकरण पाचवे

## अभ्यास गट

मुलाखती घेतांना सर्व स्तरातील व्यक्ती जास्तीत जास्त वैशि- ष्टयांचे प्रतिनिधीत्व करतील असा दृष्टिकोण समोर ठेवून तलाठी, ग्राम- सेवक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामान्य नागरिक यात वेगवेगळे वयोगट करुन त्या पध्दतीत अशा त्या गटातील व्यक्ती, विविध वय, धर्म, शैक्षणिक पात्रता, कुटुंबपध्दती, त्यातील व्यक्तिसंख्या दर्शन, राहण्याची जागा, वर्तमानपत्र वाचन, राजकीय पक्ष माहिती, त्यातील भाग इ. बाबतीत प्रत्यक्षपणे वेगवेगळ्या स्तरांतील व्यक्तींना प्रत्यक्ष मुलाखती व शेवटी जोडलेल्या प्रश्नावलीच्या आधारे माहिती गोळा करुन पुढील तक्ते हे बनविले गेले असून त्याचे विश्लेषण त्यापुढे स्पष्ट केले आहे. व माझे मत त्याबाबत सांगण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

भारतात सार्वभौम गणराज्य निर्माण करण्यासाठी परिस्थितीची निर्मिती त्याबाबतच्या बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने यात केलेली भूमिका यातील बदल याचा विचार आढळून येतो. भारतीय लोकशाहीच्या यशा- करिता न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांवर भर देण्यात आलेला आहे. अशापध्दतीची एक प्रयोगशाळा म्हणजे ग्रामपंचायत होय. कारण यांचे प्रमाण ७० % हून अधिक आहे. यांच्या विचारांचा अभ्यास म्हणजे संपूर्ण भारतीय शासनप्रणालीचा बहुतांश असा अभ्यास होय. तो पुढील तक्त्याच्या माध्यमातून अभ्यासण्याचा एक छोटासा प्रयत्न याठिकाणी केले गेलेला आढळून येईल.

टेबल नं. १

कामानुसार / हुद्दयानुसार मुलाखत देणा-या व्यक्तींची संख्या दर्शविणारा तक्ता - एकूण १०० व्यक्ती.

| शेती करणारे | | नोकरी करणारे | | घरकाम करणारे | | बेकार | | व्यापार करणारे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०० | २४ | ०४ | ४० | ११ | ०० | ०१ | ११ | ०० | ०९ |

वरील टेबलात कामानुसार विभागणी पाहिल्यास असे लक्षात येते की, सोलापूर जिल्हा हा दुष्काळी भाग असल्याने शेती करणा-या व्यक्तींचे प्रमाण कमी आहे. उत्तर सोलापूर तालुका सोलापूर शहरापासून जवळ असल्याने शहरात जाऊन काम करणा-यांचे प्रमाण जास्त म्हणजे ४४ इतके दिसून येते. शिक्षण घेवून नोकरी नसल्याने बेकार तरुणांची संख्या ११ आहे. त्याचबरोबर व्यापार मर्यादित प्रमाणात चालत असल्याचे दिसून येते.

वरील टेबलमधील विभागणी करण्यासाठी एकूण १०० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या त्या घेत असतांना विविध स्तराच्या, नोकरी करणा-या, घरकाम करणा-या बेकार अशा एकूण १६ स्त्रियांचा समावेश केला. त्यात ग्रामीण भागातून म्हणावासा व्यापार केला जात नसल्याने त्याचबरोबर स्वत: शेती करणा-या स्त्रीया आढळल्या नाहीत. तर पुरुष वरील सर्व प्रकारचे उद्योगधंदे करणारे एकूण ८४ पुरुषांच्या मुलाखती घेतल्या. मात्र यामध्ये कांही पुरुष आपण ज्या व्यवसायांवर पोट भरतो ते स्पष्ट सांगण्यास

थोडयाबहूत प्रमाणात घाबरत असल्याचे जाणवले.

टेबल नं. २

वयानुसार विभागणी दर्शविणारा तक्ता १०० व्यक्ती

| १८ ते २४ वर्षे | | २५ ते ३४ वर्षे | | ३५ ते ४४ वर्षे | | ४५ ते ६० वर्षे | | ६० वर्षापुढील | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०४ | १२ | ०१ | २३ | ०७ | २४ | ०३ | २० | ०१ | ०५ |

वरील टेबलमध्ये वयानुसार विभागणी दाखवलेली आहे. त्यात ३५ ते ४४ या वयोगटात सर्वात जास्त व्यक्ती ३१ दिसून येतात. व ६० च्या पुढील वय असणा-या व्यक्ती सर्वात कमी म्हणजे ६ इतकी आहे. २५ ते ३४ व ४५ ते ६० या वयोगटातील प्रमाण अनुक्रमे २४ व २३ इतक्या व्यक्ती आढळतात. तर १८ ते २४ या वयोगटात १६ व्यक्ती आहेत.

टेबल नं. ३

धर्मानुसार विभागणी दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| हिंदू | | मुसलमान | | बौध्द | | ख्रिश्चन | | इतर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| १३ | ७६ | ०२ | ०५ | ०१ | ०३ | ०० | ०० | ०० | ०० |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, ८९ हिंदू स्त्री-पुरुष असून मुस्लीमांचे प्रमाण ७ इतके आहे. बौध्दांचे प्रमाण सर्वांत कमी म्हणजे ४ इतके आहे. तर ख्रिश्चन व्यक्ती आढळल्या नाहीत. त्याच बरोबर इतर धर्म येथे आढळले नाहीत. अर्थात महाराष्ट्रात इतर राज्या-च्या मानाने इतर धर्म (हिंदू धर्माशिवाय) कमी प्रमाणात आढळतात. सोलापूर जिल्हा हा त्यातल्या त्यात लोकसंख्येच्या मानाने ४ थ्या क्रमांकावरील जिल्हा आहे. तद्वतहिंदू धर्माचे प्रमाण जास्त. महाराष्ट्रा-तील औरंगाबाद, उस्मानाबाद आदि जिल्हयात इतर जातीचे प्रमाण सोलापूरच्या मानाने अधिक आढळते. त्यात उत्तर सोलापूर तालुका ग्रामपंचायती ते विधान सभा, विधानपरिषद प्रतिनिधी सर्वत्र हिंदू सत्तेवर असल्याचे आढळून येते.

टेबल नं. ४

शैक्षणिक पात्रतेनुसार विभागणी दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| अशिक्षित | | १०वी पर्यंत | | पदविकाधारक | | पदवीधर | | पदव्युत्तर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०६ | १२ | ०५ | ३६ | ०१ | ०६ | ०३ | २६ | ०१ | ०४ |

वरील गुणातक्त्यावरून शैक्षणिक पात्रतेविषयी माहिती मिळवली. त्यानुसार १० वी पर्यंत शिक्षण घेणा-या व्यक्ती जास्त म्हणजे ४१ इतक्या आहेत. त्या खालोखाल पदवीधर यांचे प्रमाण खूपच कमी ५ व ७ आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, सर्वेक्षण केलेल्या १० पैकी ६ गावात माध्यमिक शाळा आहेत तर प्राथमिक शाळा सर्व गांवातून आहेत. म्हणून सुशिक्षित व्यक्तीत १० पर्यंत शिक्षण घेणारेंची संख्या जास्त दिसून येते. त्या खालोखाल सोलापूर शहरापासून जवळ असलेल्या गावात पदवीधरांचे प्रमाण जास्त आढळून येते. कारण सोलापूर महानगरपालिकाने ब-याचशा जवळच्या गांवात सिटी बसची सोय केली आहे. तसेच उच्च पदविका धारक, पदवी शिक्षणामुळे सोलापूर शहरालगत तालुका असल्याने नोकरी मिळण्याची आशा त्यांच्यामध्ये असल्याचे आढळून आले.

टेबल नं. ५

कुटुंबपध्दती दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| पध्दती | संख्या |
|---|---|
| एकत्र | ५८ |
| विभक्त | ४२ |

कुटुंब पध्दतीमध्ये एकत्र कुटुंबपध्दती असणारी याचे प्रमाण जास्त म्हणजे ५८. त्यामानाने विभक्त कुटुंबे ४२ इतके आहेत. ग्रामीण भागात मुबलक जागेची उपलब्ध असल्याने एकत्र कुटुंब पध्दतीचे प्रमाण जास्त आहे. तर विभक्त कुटुंबपध्दतीत ग्रामीण भागात नोकरीसाठी बदलून गेलेले व ग्रामीण भागातून शहरात कामासाठी जाणाऱ्या व्यक्तीचे कुटुंब विभक्त असल्याचे आढळून येते. त्याचबरोबर भारतीय समाजामध्ये त्यात प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये हिंदू समाजाचे प्रमाण अधिक असून पुरुषप्रधान संस्कृतीची पाळेमुळे ग्रामीण भागापर्यंत खोलवर रुजलेली आढळून येतात. परिणामत: स्त्रियांना जे अधिकार सामाजिक मर्यादा, कौटुंबिक मर्यादा पडतात त्यामुळे कदाचित एकत्र कुटुंब पध्दतीत स्त्रियांच्या विचारांची कुचंबणा होत असेल. मात्र तरी देखील त्यांच्या विचारांकडे डोळेझाक होऊन एकत्र कुटुंब पध्दतीचे प्रमाण अधिक असल्याचे जाणवते. मुलाखतीसाठी प्रत्येक कुटुंबाची एकच व्यक्ती निवडली. त्यामुळे १०० कुटुंबाच्या पध्दतीचा अभ्यास करता आला .

टेबल नं. ६

कुटुंबातील व्यक्ती संख्या विभागणी दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| १ ते २ व्यक्ती | ३ ते ४ व्यक्ती | ५ ते ६ व्यक्ती | ७ ते १० व्यक्ती | १० च्या पुढे |
|---|---|---|---|---|
| ०८ | १८ | ३३ | २२ | १९ |

कुटुंब व्यक्ती संख्येवरून विभागणी केल्यास निदर्शनास येते की, ५ ते ६ व्यक्ती जास्त, त्या खालोखाल ७ ते १० व्यक्तींची संख्यामध्ये २२ कुटुंबे असून १० पेक्षा जास्त व्यक्ती असणारी कुटुंबे १९ तर ३ ते ४ व्यक्तींची संख्येची कुटुंबे १८ आहेत. टेबल नं. ३ मध्ये हिंदू धर्मीय जास्त व्यक्ती आढळतात. साहजिकच हिंदू धर्मियांमध्ये कुटुंब नियोजनाचा अवलंब करण्यात आलेला असतो. त्यामुळे वरील एकत्र कुटुंब पध्दती असली तरी व्यक्ती संख्या ५ ते १० इतकी आढळते. मात्र मुस्लिम समाज कुटुंब नियोजनाला जुमानत नसल्याने व्यक्तीसंख्या १० च्या वर असलेली कुटुंबेही कांही आढळली. तर कांही हिंदू कुटुंबातील व्यक्ती "मुलें म्हणजेच देवाघरची फुले" या पध्दतीने कुटुंब नियोजन न केल्याने देखील त्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या १० च्या वर गेल्याचे आढळून आले.

टेबल नं. ७

मासिक उत्पन्नावरून विभागणी दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| ५००/-रु. पर्यंत | ५०१ ते १००० पर्यंत | १००० ते २००० पर्यंत | २०००/- च्या पुढे | कांहीही उत्पन्न नाही. |
|---|---|---|---|---|
| ३० | १८ | १५ | ३७ | ०० |

वरील तक्त्यावरून रु. २,०००/- पेक्षा जास्त उत्पन्न असणा-यांची (३७) सर्वात जास्त आहे. यातील बहुतांश व्यक्ती नोकरी करणा-या आहेत. त्या खालोखाल ५००/- रु. उत्पन्न असणा-यांची संख्या ३० इतकी आहे. यात प्रामुख्याने छोटे शेतकरी व शेतमजूर यांचा समावेश होतो. तर मधील दोन भागात खाजगी क्षेत्रात कामें करणारी व्यक्तींची संख्या आढळते. मात्र कांहीही उत्पन्न नाही अशा व्यक्ती आढळल्या नाहीत. अर्थात उत्पन्नाशिवाय मनुष्य जगूच शकत नाही अशा स्थितीत त्यांना शेती, मोठे भाऊ, वडिल यांच्या उत्पन्नावर त्यांची उपजिविका होत असल्याचे आढळून येते.

## टेबल नं. ८

राहण्याची जागा व घराचे स्वरूप दर्शविणारा तक्ता – १०० व्यक्ती

| स्वत:ची जागा | | | भाडयाची जागा | | | सरकारी जागा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| झोपडी | धाबा | काँक्रीट | झोपडी | धाबा | काँक्रीट | झोपडी | धाबा | क्रॉक्रीट |
| १७ | ५२ | १५ | ०० | ०८ | ०२ | ०० | ०० | ०६ |

घराचे स्वरूप पाहिल्यास प्रामुख्याने स्वत:च्या जागेत धाब्याचे घर बांधून राहणा–यांची संख्यासर्वांत जास्त म्हणजे ६० इतकी आहे. त्या–खालोखाल क्रॉक्रीटच्या घराची संख्या २३ आढळते. तर सर्वांत कमी झोपडयांचे प्रमाण १७ इतके आहे. ग्रामीण भागात रहाण्यास मुबलक जागा स्वत:च्या विहिरीतील दगड, झाडांचे लाकूड या गोष्टी सहजासहजी व कमी दरात मिळत असल्याने अशा प्रकारचे मातीत बांधलेल्या धाब्याच्या घरांची संख्या जास्त आढळते. तर भाडयाने जागा देण्याचे प्रमाण शहर जवळ असल्याने त्याखालोखाल असून सरकारी राहण्याच्या जागेचे प्रमाण सर्वांत कमी प्रमाण असल्याचे आढळून आले. कारण सरकारी अधिका–यांना त्यांच्या घरभाडे पगाराच्या प्रमाणात पगारातून कापले जाते. तर त्यापेक्षा कमी भाडयाने ग्रामीण भागात रहाण्यासाठी घराची जागा मिळू शकते असे कांही सरकारी जागेत न राहणा–या सरकारी नोकरीत असलेल्या व्यक्तींनी मुलाखतीवेळी स्पष्ट केले आहे.

टेबल क्र. ९

गांवानुसार मुलाखतदारांची संख्या दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| अ. नं. | गावाचे नांव | संख्या स्त्री | संख्या पुरुष | संख्या एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | तिऱ्हे | ०२ | १३ | १५ |
| २) | गुळवंची | ०२ | ०८ | १० |
| ३) | सोरेगांव | ०२ | ०८ | १० |
| ४) | वडाळा | ०२ | ०८ | १० |
| ५) | नान्नज | ०१ | ०९ | १० |
| ६) | प्रतापनगर | ०१ | ०४ | ०५ |
| ७) | भोगांव | ०१ | ०४ | ०५ |
| ८) | बाणेगांव | ०१ | ०४ | ०५ |
| ९) | कुमठे | ०२ | १३ | १५ |
| १०) | मार्डी | ०२ | १३ | १५ |

५ मे, १९९२ रोजीपासून या तालुक्यातून एकूण ११ गावे सोलापूर शहर हद्दवाढीत गेली आहेत. पैकी वरील सोरेगांव, प्रतापनगर, कुमठे या गावांतील व्यक्तींनी पूर्वीची ग्रामपंचायत वस्तुस्थिती चांगली होती. तर सध्या म.न.पा. आम्हांस आवश्यक सुविधा आतापर्यंततरी व्यवस्थितरित्या पुरविल्या जात नाहीत असे सांगितले. या तालुक्यात एकूण ४६ ग्रामपंचायती असून त्यात ३५ व हद्दवाढीत शहरात गेलेल्या ११ ग्रामपंचायती आढळतात. याठिकाणी ३ ग्रामपंचायती हद्दवाढीतील ग्रामपंचायतीच्या माध्यमाने वस्तुस्थिती दर्शवितील व इतर ७ ग्रामपंचायतीच्या अभ्यासाच्या माध्यमाने इतर ग्रामपंचायतीच्या अभ्यासाची वस्तुस्थिती आढळेल यासाठी उपरोक्त विविध १० ग्रामपंचायती येथे अभ्यासासाठी घेतल्या गेलेल्या आहेत.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

टेबल नं. १०

वर्तमानपत्रे वाचणे, व्यक्ती संख्या दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| वर्तमानपत्रे वाचतात | | वर्तमानपत्रे वाचत नाहीत. | |
|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०४ | ६८ | १२ | १६ |

वरील तक्त्यावरून वर्तमानपत्रे वाचणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त ७२ इतकी आढळते. तर २८ व्यक्ती न वाचणाऱ्या आहेत. त्यात बहुतांश अशिक्षित व्यक्ती आढळतात. सार्वजनिक वाचनालयें, ग्रामपंचायतीमधून वर्तमानपत्रे आणली जात असल्याने तेथे मोकळ्या वेळात वर्तमानपत्राचे वाचन केले जाते. असल्याचे आढळून येते. त्याचबरोबर हा तालुका राजकारणाबाबत बराचसा उत्सुकता दाखविणारा असल्याचे आढळते. कांही व्यक्ती केवळ राजकीय क्षेत्राच्या बातम्या वाचतात तर कांही बेकार पुरुषवर्ग शहरात कोणत्या सिनेमागृहात नविन एखादा चित्रपट लागला आहे का ? सध:-स्थितीत आपण शहरात गेला तर पहाण्यालायक कोणता सिनेमा कोणत्या सिनेमागृहात आहे हे पहाण्यासाठी वर्तमान पत्र वाचतात. तर शेतकरी वर्ग कृषि सल्ला, शेती विषयक करावयाची कामे, खतांचा वापर त्यांच्या जाहि-राती याचे वाचन वर्तमानपत्रांच्या माध्यमातून करत असल्याचे आढळून आले.

टेबल नं. ११

राजकिय पक्षाची माहितीबाबत संख्या दर्शविणारा तक्ता - १०० व्यक्ती

| राजकीय पक्ष माहित आहेत. | | राजकीय पक्ष माहित नाहीत. | |
|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०६ | ६१ | १० | २३ |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, राजकीय पक्षाची असणाऱ्या व्यक्ती ६७ आहेत. उत्तर सोलापूर तालुका निवडणूका राजकारण यात अग्रेसर असतो. दररोज मिळणारे वर्तमानपत्र व दूरदर्शनने विणलेले जाळे यामुळे राजकीय पक्षाची माहिती असणाऱ्या व्यक्ती जास्त आढळतात. तर ३३ व्यक्ती एकतर आपण आपले घर, काम पोट भले म्हणणाऱ्या व त्यांतील कांही सरकारी नोकरी करणाऱ्या व्यक्ती आढळल्या. त्यांनी मात्र माहिती असूनही जाणिवपूर्वक माहिती देण्याचे टाळले असल्याचे आढळून आले. त्याचबरोबर राजकीय स्थानिक आणि देशांतर्गत राजकीय पक्ष त्यांच्या कार्यपध्दती याचा अभ्यास त्यांना गप्पागोष्टी, वर्तमानपत्रे यांच्या माध्यमातून होत असल्याचे स्पष्टपणें जाणवते. कांही व्यक्तींचे मत असे आले की, ज्याप्रमाणे कोणतीही भाजी मिठाशिवाय बेचव लागते त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीचे जीवन कोणत्या ना कोणत्या कारणामधून राजकारण, राजकीय पक्ष याशिवाय निरर्थक होय.

टेबल नं. १२

राजकीय पक्षाच्या आवडीनुसार संख्या दर्शविणारा तक्ता-१०० व्यक्ती

| काँग्रेस | | भा.ज.प. | | रिपब्लीकन | | शिवसेना | | इतर पक्ष | | कोणताच नाही | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| ०९ | ४५ | ०२ | ०६ | ०२ | ०४ | ०१ | १३ | ०१ | ०४ | ०१ | १२ |

५४ व्यक्तींनी काँग्रेस पक्षाची आवड व्यक्त केली. तर १४ लोकांनी शिव सेना पक्ष आवडतो असे सांगितले. तर १३ व्यक्तींनी कोणताच पक्ष आवडत नाही असे सांगितले. त्यात शिक्षक, पोष्टमन, ग्रामसेवक, तलाठी, यासारख्या सरकारी नोकरांचा प्रामुख्याने समावेश आहे. उत्तर सोलापूर तालुका हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. त्यामुळे पक्षीय कार्यकर्ते या तालुक्यात बहुसंख्य आहेत. त्याचबरोबर कोणताच पक्ष आवडत नाही म्हणणाऱ्या व्यक्ती पक्ष त्यांचे राजकारण यास कंटाळून आवड म्हणताना आढळल्या. तर भारतीय जनता पक्ष ८, रिपब्लिकन पक्ष ६ व्यक्तींनी आवड व्यक्त केली. या तालुक्यातून श्री. सुशिलकुमार शिंदे बरेचदा निवडून विधानसभा सदस्य होते ते आता अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस म्हणून काम पहात आहेत.. त्याचबरोबर श्री ब्रह्मदेव माने (दादा) हे विधान परिषद सदस्य होते. तर सध्या ते सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन आहेत. थोडक्यात या भागातून आमदार, खासदार, पंचायत समित्या एवढेच काय जर तुरळक ग्रामपंचायती सोडल्या तर बहुतांशी ग्रामपंचायती काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडे असल्याच्या आढळल्या.

सरपंचांच्या त्याचबरोबर ग्रामपंचायतीच्या कामाच्या संबंधात विचार करावयाचा झाल्यास जवळ जवळ सर्वत्र स्थानिक गटाचे राजकारण थोर किंवा जुन्या राजकारणी व्यक्तीबाबत निष्ठा यामुळे काम समाधानकारक आहे. अशाच अर्थाने मत प्रदर्शित केले तर कांही ठिकाणी मात्र विरोधी गट कार्य असमाधानकारक आहे असे म्हणणारा आढळला. तर कांही ठिकाणी सरपंच तिथे राहत नाही मग त्याचे काम कसे असेल अर्थातच प्रत्यक्ष वस्तुस्थिती व त्या ग्रामस्थांचे मत ग्रामपंचायत व सरपंच यांचे काम असमाधानकारक आहे हे बरोबर असल्याचे आढळून आले.

प्रत्येक गांवासाठी शासकीय प्रतिनिधी या नात्याने पोलीस पाटील स्वतंत्र असा असलेला आढळला. मात्र तलाठी, ग्रामसेवक मात्र प्रत्येक ग्रामासाठी स्वतंत्र नसून दोन ते तीन ग्रामपंचायतीच्या गटासाठी एक मोठी ग्रामपंचायत असेल. (१५०० पुढे लोकसंख्या) त्याठिकाणी स्वतंत्र तलाठी व ग्रामसेवक असल्याचे आढळले.

शासनाच्या अनेकविध रोजगार, शिक्षण, धान्य, बी-बीयाणे, खतें, अनुदान याबाबत योजना त्या भागाचा गटविकास अधिकारी शासनाच्या योजना आणतो. त्यास गांवक-यांचा प्रतिसाद मिळतो. मात्र त्या योजनांचा लाभ मात्र सधन शेतकरी, राजकीय पुढारी, आप्त, स्वकीय व्यक्ती जास्त प्रमाणात घेतात व सामान्य व्यक्ती मात्र या योजनेचा लाभापासून परावृत्त अशा असल्याचे आढळून आले. स्थानिक गटबाजी त्याचबरोबर शेती, घरजागा यांच्या मालकी वहिवाटी, हक्क रस्ते, बांध, झाडें यांच्या माध्यमातून तसेच भावकी या मूळें नेहमी होत असलेल्या मारामा-या कांही होऊन गेलेले खून यामुळे त्या गांवात कायम किंवा

तात्पुरत्या स्वरूपाची पोलीस चौकी अस्तित्वात असल्याचे आढळून आले.

महाराष्ट्र शासनाने गांव. तेथे वीज, पाणीपुरवठा, प्राथमिक शिक्षण, आरोग्य यादृष्टीने १००% पूर्तता केलेली आढळली. सर्वच गांवात चौकातून दिवाबत्ती केली जाते. पाणीपुरवठा सोय शासनाने केली. मात्र नळ लहानमोठे असणे, पाण्याची पातळीच्या मानाने घर उंचावर असणे यामुळे सर्वांना भरपूर पाणी मिळू शकेलच असे नाही. त्याचबरोबर प्राथमिक शाळा ह्या सर्व गांवामधून आढळल्या. त्याचबरोबर मुलाखत घेतलेल्या १० गांवापैकी ६ गांवातून माध्यमिक तर ३ गांवात ज्युनियर कॉलेजची सोय असल्याचेही आढळून आले. सार्वजनिक स्वच्छतेच्या मानाने सोयी कांही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा छोटया गटारी केलेल्या आढळल्या. मात्र शेतीसाठी खत लागते. ते केरकचरा एकत्र करून प्रत्येक शेतकऱ्याचा स्वतंत्र उकिरडा असल्याचे आढळून आले.

स्वत:च्या गांवची ग्रामपंचायत स्थापना वर्ष माहिती नसल्याचे बऱ्याच व्यक्तींनी सांगितले. तर कांही वयाने वृध्द राजकारणात नेहमी सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी ग्रामपंचायत स्थापना वर्ष दिवस महिना देखील सांगितला. मुलाखतदारांपैकी फक्त ९ व्यक्तींनी महाराष्ट्रात ग्रामपंचायतीचा कायदा केंव्हापासून लागू करण्यात आला व त्याचा कायदा हे मात्र फक्त ३ व्यक्तींनी मुलाखतीवेळी स्पष्ट केले. इतर व्यक्तींनी माहिती नाही असे स्पष्ट सांगितले.

.....